ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# २१ व्या शतकातील समावेशित शिक्षणाची गरज व सदयस्थिती

**प्रा. कुलकर्णी ज्योती दिपक**

*प्राध्यापिका, गोखले एज्युकेशन सोसायटीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर*

**Abstract**

*शिक्षण ही अखंड चालणारी, निरंतर चालणारी प्रक्रिया आहे सहज, अनौपचारिक व औपचारिक पध्दतीने व्यक्ति सतत शिक्षण घेत असते. मात्र ते घेणा-या प्रत्येकाची बौध्दित पातळी, बुध्यांक किंवा काठिण्य पातळी सारखीच नसते तसेच त्यांच्या सवयी, आवडी निवडीही सारख्या नसतात. शाळेतील उपक्रमांमध्ये अशी मुले कमी अधीक प्रमाणांत सहभागी होतात.पण त्यांच्या सोबतच काही अपंग, अक्षम, कमी बुध्दयांक असलेली मुले असतील तर ते शाळेच्या सर्व उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकत नाहीत व त्यांच्याकडे समाज कुत्सित नजरेने बघत असतो व हे टाळण्यासाठी १९७७ मध्ये जागतिक स्तरांवर चर्चा सुरु झाली. सुरुवातीस हा विचार मानवी हक्कातून पुढे आला. भारतात रिव्हचन संस्थांनी पुढाकार घेऊन प्रथम समावेशक शिक्षणास सुरुवात केली. त्यानंतर अपंग व्यक्ती अधिकार १९७०, १९८६ व १९९२ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ नवीन अभ्यासक्रम आराखडा २००१, २००५ यामध्ये विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांच्या विकासाची उद्दिष्टे डोळयासमोर ठेऊन बदल घडवून आणण्यात आलेला आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य उद्देश सर्वसमावेशक विकासाची उद्दिष्टे डोळयासमोर ठेऊन विकास घडवून आणणे आणि विकास प्रक्रियेत सर्वात शेवटी असलेल्यांना ही समाविष्ट करुन घेणे व त्यांना योग्य तो न्याय मिळवून देणे हाच होता यामुळेच आज शिक्षणशास्त्र पदवीच्या अभ्यासक्रमात समावेशक शिक्षण हा सक्तीचा विषय म्हणून सुरु झाला व सर्व शाळांमधूनही समावेशक शिक्षण देणे सुरु झाले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

आज २१ व्या शतकांत शिक्षणाच्या संकल्पना वेगाने बदलत आहे. ब्रिटीशकाळात जन्माने भारतीय व कर्माने ब्रिटीश तयार करणारे म्हणजेच कामगार वा कारकून तयार करणारे शिक्षण दिले जात होते. स्वातंत्र्योत्तर काळांत भारतीयांच्या विकासासाठी शिक्षणातून प्रयत्न सुरु झाले अज्ञान अंध:काराच्या, रुढी परंपरांच्या जोरवडात अडकून पडलेल्या समाजात शिक्षणातूनच सज्ञान करण्यासाठी प्रयत्न सुरु होते. कारण महात्मा फुलेंच्या मते, विदयेविना मती गेली। मतिविना नीती गेली। नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविदयेने केले। कोठारी आयोगाने म्हटल्याप्रमाणे भारताचे भविष्य शाळांच्या वर्गखोल्यातून घडते म्हणूनच राष्ट्रातील कोणतेही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शिक्षण कायदा अस्तित्वात आला व त्याची अंमलबजावणी ही सुरु झाली. वेगवेगळया स्तरातून येणा-या विदयार्थ्यांचा स्वीकार करुन त्यांना सर्वसामान्यांच्या शिक्षण प्रवाहात आणून त्यांच्याप्रमाणे बनविणे हे समावेशित शिक्षणाचे कार्य आहे वर्गातील प्रत्येक जण हा स्वत: एकमेवच असतो त्याचे स्वत:चे व्यक्तित्व, अस्तित्व असते त्यामुळे अशा मुलांना सर्वसामान्यांप्रमाणे बनविले तरच समावेशित शिक्षणाचा उद्देश सफल होईल.

**सर्व समावेशक शिक्षणाचा अर्थ :-**

२१ व्या शतकांत समावेशक शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आलेले असून त्यामूळे शिक्षणप्रवाहापासून दूर राहिलेला वर्ग शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे. १९८१ च्या आंतरराष्ट्रीय अपंग वर्षापासून या संकल्पनेस चालना मिळू लागली. १९९० मध्ये थायलंड मधील जेमोटियम येथील परिषदेत समावेशक शिक्षणाची गरज या विषयावर चर्चा होऊन ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. शिक्षणप्रवाहात सर्वांचा समोवश म्हणजे समावेशक शिक्षण होय. १९९४ मध्ये समावेशक शिक्षण संकल्पना स्पेनमधील Salamacha शहरांत झालेल्या परिषदेत ही संकल्पना उदयास आली म्हणून त्यास Salamcha statement असेही म्हणतात.

आज भारतामध्ये अनेक वर्षीपूर्वी अस्तित्वात असलेल्या विशेष गरजा असलेल्यांच्या वेगळया शाळांचा दृष्टीकोन मागे पडून त्यांचाही सर्वसामान्यांच्या शाळेतच समावेश करुन त्यांचा मानसिक, बौध्दिक आर्थिक, सांस्कृतिक असा भेद न करता सर्वांनाच एकसारखे एकत्रित शिक्षण देणे सुरु झाले आहे व त्यासाठी अशा विदयार्थ्यांना पुढील काही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. १) शिक्षणासाठी शैक्षणिक साहित्य २) गणवेश पुस्तके ३) शिक्षणासाठी प्रवास व्यवस्था ४) शिष्यवृत्ती ५) नोकरी मिळविण्यासाठी सहकार्य ६) अपंगत्त्वानुसार योग्य मूल्यांकन करण्याची पध्दती.

**समावेशक शिक्षणाची उद्दिष्टे :-**

१. समावेशक शिक्षणाचा अर्थ समजणे.
२. विशेष शिक्षणाच्या संकल्पना स्पष्ट करणे.
३. असमर्थ, अपंग यातील फरक समजून घेणे.
४. समावेशक शिक्षणात विदयार्थ्याच्या गरजानुरुप अध्यापन पध्दती निश्चित करणे.
५. समावेशित शिक्षणाबाबत शासनाची भूमिका समजाऊन घेणे.
६. शिक्षकांना समावेशित शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे.
७. समावेशक शिक्षणात शाळेचे स्वरुप समजावून घेणे.
८. त्यांच्या सुविधाची सदयस्थिती जाणून घेणे.

**समावेशित शिक्षणाची गरज व महत्त्व :-**

१. सर्वस्तरातील विदयार्थ्यांना समावेशित शिक्षणात प्रवेश घेता यावा.
२. सर्व उपक्रमांत सर्वांना सहभागी होता येण्यासाठी.
३. सर्व विदयार्थ्यांमध्ये परस्परसंबंध प्रस्थापित होऊन ते दृढ होण्यासाठी समावेशित शिक्षणाची गरज आहे.
४. पालकांना त्यांची भूमिका समजावून देण्यासाठी व त्यांच्यात मित्रत्वाचे संबंध वाढविण्यासाठी.
५. विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी समावेशित शिक्षणाचे महत्त्व आहे.
६. मुलांच्या प्रगतीकडे समावेशित शिक्षणामुळे लक्ष देता येते.
७. मुलांना उच्च ध्येय गाठण्यासाठी व त्यांच्या व्यक्तिगत शक्तींचा विकास होण्यासाठी समावेशित शिक्षण महत्त्वाचे आहे.
८. समावेशित शिक्षणामुळे सर्व प्रकारचे विदयार्थी आपली वैयक्तिक उद्दिष्टे गाठण्यासाठी उद्युक्त व्हावेत यासाठी महत्त्व आहे.
९. समावेशित शिक्षणामुळे शाळेतील सर्व विदयार्थ्यांमध्ये आपलेपणाची भावना वाढीस लावता येते तसेच स्वत:च्या चुका समजून घेण्याचीही संधी प्राप्त होते म्हणूनच समावेशित शिक्षणाची गरज व महत्त्व वाढते आहे.

**समावेशित शिक्षण कसे राबवाल?**

समावेशित शिक्षणात विशेष गरजा असलेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांची यादी करावी व तज्ञांच्या मदतीने त्यांची तपासणी करुन योग्य पध्दतीने त्यांचे शिक्षण सुरु करावे प्राथमिक व माध्यमिक स्तरावर जे पुस्तकी ज्ञान मिळवू शकत नाही अशांना व्यावसायिक कौशल्य शिकवून त्यांना ज्ञान दयावे तसेच त्यांना मुलभूत सेवा पुरविताना वर्गशिक्षक, पालक सहाध्यायी व वर्गमित्र यांच्याकडून त्वरीत व वारंवार ज्या सेवा पुरविल्या जातात त्या अत्यावश्यक सेवेत येतात. तसेच विशेष शिक्षणाचे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षित शिक्षकाची सेवा ही सहायक सेवा म्हणुन अपंगांना दिली जाते. तर तात्कालिक सेवा म्हणून अपंगांना काही अंशत: सेवाही पुरविल्या जातात.

विशिष्ट अपंगत्वानुसारही शिक्षण देताना अंध मुलांना प्रत्यक्ष वस्तु हाताळण्यास देऊन स्पर्शद्वारे ज्ञान दयावे कर्णबधिर मुलांना पुढील बाकांवर बसवून ज्ञान देताना दृष्य माध्यमांचा जास्त वापर करावा.

विदयार्थ्यांच्या गरजा पूर्ण करणारे स्वावलंबी बनविणारे ज्ञान देताना खेळ, करमणूक प्रत्यक्ष हातांना काम देऊन त्याचा भाविक व व्यावहारिक विकास करावा. अपंगांना शाळेत आणण्यासाठी साधनांची सोय करावी. शिक्षकांनी विषय सोपा करुन अध्यापन करावे.

**समावेशक शिक्षणांत शिक्षकाची भूमिका :-**

१. विदयार्थ्यांच्या अपंगत्त्वासंबंधी पूर्वेतिहास शिक्षकाने समजून घ्यावा.
२. सामान्य विदयार्थी व विशेष गरजा असणारे विदयार्थी यांच्यातील आंतरक्रिया वाढविण्यासाठी त्यांचा परस्परांना परिचय करुन देऊन त्यांना गरजेप्रमाणे मदत करण्यास सांगणे.
३. शिक्षकांनी स्वत: विशेष गरजा असलेल्या मुलांचे दैनंदिन व योग्य निरीक्षण करावे.
४. जास्तीत जास्त शैक्षणिक साधनांचा वापर करुन शिक्षकांनी अध्यापन करावे, उपकरणे, साधने इ. ची मांडणी योग्य पध्दतीने करुन वर्गव्यवस्था ठेवावी.
५. वारंवार पालकसभांचे आयोजन करुन विदयार्थ्यांच्या प्रगतीची व शालेय सुविधांची माहिती पालकांना करुन दयावी.
६. समावेशित शिक्षणाबाबात समाजात चांगला दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करावेत.
७. समावेशित शिक्षणासंदर्भातील कायदयांचे ज्ञान व त्याचा अभ्यास शिक्षकांनी जरुर करावा.
८. अपंग विदयार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी विदयार्थ्यांना अपंगांच्या यशस्वीतेच्या विविध कथा, प्रसंग सांगावेत तसेच त्यांच्या कार्यक्रमाचेही आयोजन करावे.

**सारांश :-**

शिक्षण हा प्रत्येकाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटक आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिमत्त्व विकास होतो जन्मपूर्व अवस्थेपासून मृत्युपर्यंत व्यक्ती वेगवेगळया मार्गांनी शिकत असते. शिक्षणप्रवाहात सर्व प्रकारच्या व्यक्तीना सामावून घेऊन त्यांचा विकास करणे म्हणजे समावेशित शिक्षण होय. अशा विदयार्थ्यांना शाळेच्या व समाजाच्या सर्व उपक्रमांत आत्मविश्वासाने सहभागी होता येऊन त्यांच्यातील आंतरक्रिया वाढून अपंग विदयार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे ही आज काळाची गरज आहे व त्यासाठी शाळा, शिक्षक, समाज, पालक या सर्वांच्याच भूमिका २१ व्या शतकांत महत्त्वाच्या ठरणार आहेत.

**संदर्भ**

*करंदीकर सुरेश (१९९५) भारतीय समाजातील शिक्षण.*
*डॉ. घोरमोडे के.यू., डॉ. कला घोरमोडे - शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चिमात्य.*
*प्रा. अरुण सांगोलेकर, नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह.*
*अपंग समावेशित शिक्षण हस्तपुस्तिका, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.*
*www.pbs.org/parents/education/learning-disabilities/inclusive-education.*
*www.thewaddle.com/importance-inclusive-education.*